# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

कृषि नगर, वसमत रोड, परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| --- | --- | --- | --- |
| वेबसाईट | : www.vnmkv.nic.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


वाचा : कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.अेयुजी-३७१९/सीआर-४१/६-अे दिनांक १२.८.२०२१

**सहायक प्राध्यापक संवर्गाचे विषय निहाय सेवा प्रवेश नियम प्रसिध्द करणेबाबत.**

## विद्यापीठ परिपत्रक

क्र.२०२३/प्र.क्र.१२७६/सेप्रनि/आस्था-१/ 3092

दिनांक : १० जुलै २०२३

**परिपत्रक :**

विद्यापीठातील सर्व शिक्षकवर्गीय अधिकारी / कर्मचा-यांच्या रिक्त जागा भरण्याकरीता बिंदूनामावली शासन मान्यतेसाठी सादर केली असता त्यांनी प्रत्येक संवर्गाचे सेवा प्रवेश नियम सादर करण्याबाबत सुचित केले आहे. त्यानुसार विद्यापीठातील शिक्षकवर्गीय संवर्गाचे विषय निहाय सेवा प्रवेश नियम तयार करण्याची बाब विद्यापीठाच्या विचाराधीन होती.

विद्यापीठातील सर्व शिक्षकवर्गीय अधिकारी / कर्मचा-यांना सदर परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, विद्यापीठातील सहायक प्राध्यापक संवर्गाचे विषय-निहाय सेवा प्रवेश नियम तयार करण्यात येवुन विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

सदर सेवा प्रवेश नियमाबाबत संबंधित विषयाच्या शिक्षकवर्गीय अधिकारी / कर्मचा-यांचा कोणताही आक्षेप असल्यास सदर आक्षेप पुराव्यासह थेट या कार्यालयास दिनांक १९ जुलै २०२३ पुर्वी सादर करावा. जेणेकरून सदर आक्षेपाचा विचार करून त्यामध्ये सुधारणा करण्यात येऊन अंतिम झालेले सेवाप्रवेश नियम विद्यापीठ विद्वत व कार्यकारी परिषदेच्या बैठकीसमोर सादर करुन अंतिम करण्यात येतील.

त्यामुळे विहित मुदतीत आक्षेप सादर करावेत अन्यथा विहित मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

मा.कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने.

(धिरजकुमार रा.कदम)
**कुलसचिव**

प्रत :

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/ संचालक संशोधन/ संचालक विस्तार शिक्षण वनामकृवि, परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व कार्यालय व कर्मचा-यांच्या निर्दशनास आणून देण्यात यावे.
२. प्रभारी अधिकारी, विद्यापीठ संगणक केंद्र, यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक व त्यासोबत देण्यात आलेले सहायक प्राध्यापक संवर्गाचे विषय निहाय सेवा प्रवेश नियम विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
३. मा.कुलगुरू यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.